

# रुग्णवाहिका

कोटिकोटि जनतेची सदाबहार जगसेविका
प्राणसखी माझी रुग्णवाहिका ॥

लाखलाख रुग्णांची मायमाऊली
माया-ममतेची घनदाट सावली
रात्रंदिवस कार्यमग्न - जशी उद्योजिका
प्राणसखी माझी रुग्णवाहिका ॥

पूर्व-पश्चिम - दक्षिण-उत्तर - दशदिशा पळते
विसाव्याचा शब्द ओठावर ना उच्चारते
नाही अहम् नाही अहमिका
प्राणसखी माझी रुग्णवाहिका ॥

या जन्मी निज मोक्ष मिळावा
जीवदान देता देवा - घंटानादातून मंत्र जपावा
हाच मानस देवाचा आणि दैवाचा असेल का?
प्राणसखी माझी रुग्णवाहिका ॥

**व्हिडिओ पहा**

सुधा मराठे
डावी भुसारी कॉलनी कोथरूड
M.o - 9924215334